दैनिक
# शुभ प्रभात
SHUBH PRABHAT | एक नव्या युगाचा आरंभ...

विभागीय वृत्तपत्र | www.shubhprabhat.co.in | E-Mail : dainikshubhprabhat@gmail.com

Marathwada : Volume No. 02, Issue No. 29, Marathi Daily Tuesday, Date - 28 July 2026 Price 2 Rupees, Pages - 4 PRGI Reg. No. - MHMAR/25/A1228

मराठवाडा अवृत्ती | वर्ष २ रे | अंक २९ वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. २८ जुलै २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४ ABD/544/2025-2027








## संपादकीय

### जालना शहराची प्रतिमा मलिन

जालना हे मराठवाड्याच्या मध्यवर्ती भागातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते. दररोज हजारो नागरिक, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी आणि विविध जिल्ह्यांतील वाहनचालक जालन्यात ये-जा करतात. मात्र, अलीकडच्या काळात शहरात बाहेरील जिल्ह्यांतील वाहनचालकांना अडवून पैशांची लूट करण्याच्या घटना वाढत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. अशा प्रकारांमुळे केवळ कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही, तर जालना शहराची विश्वासार्हता आणि सुरक्षिततेची प्रतिमाही धोक्यात येते. बाहेरून आलेल्या वाहनचालकांना रस्ता अडवून दमदाटी करणे, किरकोळ कारणांवरून वाद घालणे, वाहनांच्या किरकोळ धडकेचे निमित्त करून पैसे उकळणे किंवा टोळक्याच्या बळावर आर्थिक लूट करणे, हे प्रकार अत्यंत चिंताजनक आहेत. काही वेळा अशा घटनांची भीती वाटल्याने अनेक पीडित व्यक्ती पोलिसांत तक्रार करण्याचेही टाळतात. यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढत जाते. जालना हे औद्योगिक आणि व्यापारीदृष्ट्या वाढणारे शहर आहे. येथे गुंतवणूक, व्यापार आणि उद्योग वाढण्यासाठी सुरक्षित वातावरण असणे अत्यावश्यक आहे. परंतु शहरात येणाऱ्या प्रवाशांना जर असुरक्षिततेची भावना निर्माण झाली, तर त्याचा थेट परिणाम स्थानिक व्यापार, वाहतूक आणि शहराच्या प्रतिमेवर होणार आहे. एका शहराची ओळख केवळ विकासकामांमुळे होत नाही, तर तेथील कायदा-सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षिततेमुळेही होत असते. या प्रकारांवर तातडीने कठोर कारवाई करणे ही काळाची गरज आहे. संवेदनशील चौक, महामार्ग, शहरातील प्रवेशद्वारे आणि निर्जन भागात पोलिसांची गस्त वाढविणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी विशेष पथके कार्यरत ठेवून संशयित टोळ्यांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. शहरातील महत्त्वाच्या मार्गांवर कार्यक्षम सीसीटीव्ही यंत्रणा उभारून त्याचे नियमित निरीक्षण केले पाहिजे. तसेच अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांना कायद्याचा धाक दाखविणे आवश्यक आहे. नागरिकांनीही अशा घटनांकडे दुर्लक्ष करू नये. लुटमारीचा प्रयत्न झाल्यास तातडीने पोलिसांना माहिती देणे, वाहनातील कॅमेऱ्यांचा वापर करणे आणि आवश्यक पुरावे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. समाजातील सजग नागरिक, व्यापारी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनीही पोलिस प्रशासनाला सहकार्य करून सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. जालना हे सर्वांचे शहर आहे. येथे येणारा प्रत्येक नागरिक आणि पाहुणा सुरक्षित असल्याची भावना निर्माण करणे ही प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. लुटमारीच्या घटना रोखण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना करण्यात आल्या, तरच जालना शहराची स्वच्छ, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रतिमा कायम राहील. अन्यथा काही समाजकंटकांच्या कृत्यांमुळे संपूर्ण शहराची बदनामी होण्याचा धोका नाकारता येणार नाही. वेळ अजून गेलेली नाही. प्रशासनाने ठोस पावले उचलली, नागरिकांनी जागरूकता दाखवली आणि कायद्याचा धाक कायम ठेवला, तर जालना पुन्हा सुरक्षित आणि विश्वासार्ह शहर म्हणून ओळखले जाईल. हीच काळाची गरज आहे.

# भारत देश विजयी: देशभर आनंदोत्सव



कारगिल युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अत्युत्कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. शेवटी कारगिल युद्ध भारताने जिंकले. सदर माहितीपूर्ण रोचक लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक.

इ.स.१९९८-९९च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांना मुजाहिदीनच्या वेषात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला ऑपरेशन बद्र असे नाव देण्यात आले. कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी रिकाम्या भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. हिवाळ्यात प्रचंड थंडीमुळे सैन्य माघारी घेतले गेले. नियंत्रण रेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १च्या जवळ यायचे. असे केले, की महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल. नंतर राजकीय वजन वापरून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल, असा हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रणरेषा मान्य करायला भाग पाडले, की लडाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल, असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारगील- काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला अजून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारतीयांनी सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवण्यात जी क्प्ती वापरली. तसाच काहीसा प्रकार पाकिस्तानने केला, असा काही लेखकांचा सूर होता.

कारगिल युद्ध हे भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान सन १९९९च्या उन्हाळ्यात लढले गेलेले मर्यादित युद्ध होते. या युद्धाची व्याप्ती भारताच्या कारगिल व आजूबाजूच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली, त्यामुळे याला मर्यादित युद्ध म्हणतात. तसेच या पूर्वीच्या भारत-पाक युद्धांप्रमाणेच याही युद्धात, युद्ध सुरू झाल्याची व संपल्याची कोणतीही घोषणा करण्यात आलेली नव्हती. उलट पाकिस्तानतर्फे युद्धादरम्यान त्यांचा देश अलिप्त आहे, असा कांगावा करण्यात आला होता. पुढे अनेक वर्षांनंतर हळुहळू पाकिस्तान सरकारने व अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी हे युद्धच होते, असे जाहीर केले. सन १९९९च्या उन्हाळ्यात पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाणी कब्जात घेतल्याचे भारताच्या लक्षात आले. या घुसखोरांना हुसकावण्यासाठी कारगिलचे युद्ध सुरू झाले. ही ठाणी कारगिल व द्रास परिसरातील अतिउंच दुर्गम जागी होती. अनेक महिन्यांच्या प्रयत्नांनंतर भारताला ही ठाणी परत मिळवण्यात यश मिळाले. कारगिल हे शहर जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगरपासून २०५ किमी अंतरावर भारत-पाक आंतरराष्ट्रीय नियंत्रण रेषेपासून जवळ आहे. हिमालयाच्या इतर भागाप्रमाणे कारगिलंमध्येही थंड वातावरण असते. उन्हाळा हा सौम्य तर हिवाळा अतिशय दीर्घ व कडक असतो. बऱ्याचदा तापमान -४० अंशापर्यंतही उतरू शकते. राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या जवळच्या आणि रस्त्याला समांतर अशा १६० किलोमीटरच्या पट्ट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हे तर आग्नेयेकडील द्रास व नैर्ऋत्येकडील मश्को खोऱ्यातील, तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली.

कारगिल शहर हे सामरिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. इ.स.१९७१च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये थेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या मोठ्या चकमकी होत आहेत. भारतीयांच्या सियाचीन हिमनदीवर तसेच सभोवतालच्या परिसरावर नियंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत्नशील असतात. इ.स.१९८०च्या सुमारास पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पंजाबात खलिस्तानच्या नावावर दंगा घातला. तसेच इ.स.१९९०च्या सुमारास काश्मीरमध्ये दहशतवादाने मूळ धरले. परिणामी भारताने काश्मीरमध्ये कायमस्वरूपी सैन्य तैनात केले. हे दहशतवादी सुरुवातीच्या काळात काश्मीरमधील असत व त्यांना प्रशिक्षित करून पाठवले जात असे. काही काळानंतर पाकिस्तानी सैनिक, अधिकारी व तालिबानी अफगाणिस्तानातील भाडोत्री अतिरेक्यांनाही काश्मीरमध्ये पाठवले जाऊ लागले. पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत, असे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला. इ.स.१९९८मध्ये भारत पाकिस्तानने अणुचाचण्या केल्यानंतर दोन्ही देशातील संबंध चांगलेच ताणले गेले. परंतु तत्कालीन पंतप्रधान मा.वाजपेयी साहेबांनी मैत्रीचा हात पुढे करून संबंध निवळण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी ते स्वतः लाहोरला जाऊन आले होते.

द्रास व मश्को खोऱ्यातील चौक्या या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असते. हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूने सैन्याची माघार व्हावी, उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी रहाण्यास स्थिर झाल्यानंतर ते ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा अलिखित समझौता भारत-पाकिस्तानमध्ये, कारगिल युद्धाच्या आधीपर्यंत होता. मात्र सन १९९९ साली भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे कारगिलचे युद्ध भडकण्यास ठिणगी पडली. या चौक्यांचा ताबा घेतला गेल्याने राष्ट्रीय महामार्ग १ए- एनएच१ हा पाकिस्तानी तोफगोळ्यांच्या आणखी जवळच्या टप्प्यांत आला. तसेच उंचावरील चौक्यांचा ताबा घुसखोरांकडे गेल्याने त्यांना उतारावरील चौक्यावर नियंत्रण ठेवणे सोपे गेले. या चौक्या डोंगरमाथ्यावरील किल्ल्यांप्रमाणे होत्या. त्यांचा ताबा मिळवण्यास मोठ्या प्रमाणावर फौजेची गरज लागते. त्यातच अतिउंची व कडाक्याची थंडी हे काम अजूनच अवघड करते.


हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अत्युत्कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे दाखवलेल्या संयमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले. म्हणूनच भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळाला व याउलट, सैन्य मागे घ्यावे, यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी दबाव आणला. या युद्धानंतर भारताने आपल्या संरक्षण खर्चात अनेक पटीने वाढ केली. तर पाकिस्तानात राजकीय अस्थिरता माजली. परिणामी काही महिन्यांतच- ऑक्टोबर १९९९मध्ये पाकिस्तानात जनरल परवेझ मुशर्रफ यांनी नवाझ शरीफ यांचे सरकार उलथून लष्करशाही लागू केली. कारगिल युद्ध भारताने जिंकले. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!! कारगिल विजय दिनाच्या सर्व देशप्रेमी भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**मो ९६९९८३६७१७.**

# अलिबागमध्ये चार कोटी रुपयांचे अँबरग्रीस जप्त

**रायगड । प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील अलिबाग पोलिसांनी वन्यजीव तस्करीविरोधात मोठी कारवाई करत सुमारे चार कोटी रुपये किमतीचे दुर्मिळ अँबरग्रीस जप्त केले आहे. विशेष गस्तीदरम्यान चाळमाळा परिसरात ही कारवाई करण्यात आली असून या प्रकरणी राहुल पंढरीनाथ हातणी या संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या अँबरग्रीससह दुचाकीही पोलिसांनी ताब्यात घेतली असून एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे सव्वाचार कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग पोलिसांचे विशेष पथक चाळमाळा परिसरात नियमित गस्त घालत असताना चाळमाळा धक्क्याजवळ एक दुचाकीस्वार संशयास्पद हालचाली करताना आढळला. पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली. त्यानंतर दुचाकीची सखोल झडती घेतली असता, डिकीत ठेवलेल्या कापडी पिशवीमध्ये सुमारे चार किलो वजनाचा अँबरग्रीस आढळून आला.

पोलिसांनी तातडीने हा पदार्थ ताब्यात घेतला. प्राथमिक तपासानुसार, जप्त करण्यात आलेल्या अँबरग्रीसची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे चार कोटी रुपये इतकी आहे. त्याचबरोबर संशयिताची दुचाकीही जप्त करण्यात आली असून एकूण मुद्देमालाची किंमत सव्वाचार कोटी रुपयांपर्यंत पोहोचत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी राहुल पंढरीनाथ हातणी याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात त्याच्याविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे समोर आले असले, तरी या तस्करीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, अँबरग्रीस कोठून आणण्यात आले आणि ते कोणाला विक्रीसाठी नेले जात होते, याचा सखोल तपास पोलिसांकडून सुरू आहे.


अँबरग्रीस हा समुद्रात आढळणाऱ्या स्पर्म व्हेल या दुर्मिळ प्रजातीच्या पचनसंस्थेत तयार होणारा मेणासारखा पदार्थ आहे. हा पदार्थ समुद्रात बाहेर पडतो आणि कालांतराने किनाऱ्यावर वाहून येतो. त्याच्या विशिष्ट गुणधर्मांमुळे महागडी सुगंधी द्रव्ये तयार करण्यासाठी तसेच काही औषधी उत्पादनांमध्ये त्याचा वापर केला जात असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात त्याला मोठी मागणी आणि प्रचंड किंमत मिळते.

भारतात वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार अँबरग्रीसची खरेदी, विक्री, साठवणूक किंवा तस्करी करणे हा गंभीर आणि अजामीनपात्र गुन्हा मानला जातो. त्यामुळे या प्रकरणात संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येत असून या तस्करीमागील संपूर्ण जाळ्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

अलिबाग पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे वन्यजीव तस्करीच्या आंतरराज्य किंवा आंतरराष्ट्रीय साखळीचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, या प्रकरणातील पुढील तपास सुरू आहे.

# नीट आंदोलनातील रिया यादव अहिरला समाजमाध्यमांवरून धमक्या; पोलिसांकडे तक्रार

**मुंबई । प्रतिनिधी**




नीट प्रश्नपत्रिका गळतीविरोधातील आंदोलनादरम्यान पोलिसांच्या वाहनासमोर ठामपणे उभी राहून विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आवाज उठवणारी रिया यादव अहिर आता समाजमाध्यमांवरील छळ, धमक्या आणि बदनामीचा सामना करत आहे. आंदोलनातील तिचा छायाचित्र मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाल्यानंतर काही व्यक्तींनी तिच्याविरोधात अपप्रचार सुरू केल्याचा आरोप तिने केला आहे. या प्रकरणी तक्रार देण्यासाठी रिया संबंधित पोलिस ठाण्यात पोहोचली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी तिने केली आहे. नीट प्रश्नपत्रिका गळतीप्रकरणी देशभरात विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले होते. राजधानी दिल्लीतील आंदोलनानंतर मुंबईसह अनेक शहरांमध्येही विद्यार्थ्यांनी निषेध व्यक्त केला होता. मुंबईतील दादर परिसरात आंदोलनादरम्यान पोलिसांनी काही विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले होते. त्यावेळी त्यांना घेऊन जाणाऱ्या पोलिसांच्या वाहनासमोर रिया यादव अहिर एकटीच ठामपणे उभी राहिली होती.

भर पावसात जवळपास चाळीस मिनिटे पोलिसांचे वाहन अडवून ठेवत आंदोलक विद्यार्थ्यांची तातडीने सुटका करण्याची मागणी तिने केली होती. तिच्या या धाडसी भूमिकेची छायाचित्रे आणि दृक्श्राव्य चित्रफिती समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्या. अनेकांनी तिच्या धैर्याचे कौतुक केले, तर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी लढणारा चेहरा म्हणून तिची ओळख निर्माण झाली. मात्र, या घटनेनंतर परिस्थिती बदलली. रियाच्या म्हणण्यानुसार, समाजमाध्यमांवर तिच्याविरोधात अपप्रचार सुरू करण्यात आला. तिच्या वैयक्तिक समाजमाध्यम खात्याबाबत खोटे दावे करण्यात आले. तिचे खाते बनावट असल्याचा प्रचार करण्यात येत असून, तिच्या प्रतिमेला धक्का पोहोचविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होत असल्याचा आरोप तिने केला आहे.

याबाबत बोलताना रियाने सांगितले की, तिचे छायाचित्र प्रसारित झाल्यानंतर तिला मोठ्या प्रमाणावर अपमानास्पद संदेश येऊ लागले. काही जणांकडून धमक्याही दिल्या जात आहेत. तिच्याविषयी चुकीची माहिती पसरविली जात असून, एका दृक्श्राव्य माध्यम निर्मात्याने तिच्याबाबत दिशाभूल करणाऱ्या चित्रफिती तयार केल्याचाही तिने आरोप केला आहे. तिचे समाजमाध्यम खाते पूर्णपणे खरे असून त्यातून तिला कोणताही आर्थिक लाभ मिळत नसल्याचेही तिने स्पष्ट केले.

या सर्व प्रकारामुळे मानसिक त्रास होत असल्याने संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई व्हावी, यासाठी तिने पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. तक्रारीनंतर पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू होण्याची शक्यता आहे. रिया यादव अहिर ही अभिनेत्री, प्रतिकृती सादर करणारी कलाकार तसेच कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करणारी म्हणूनही ओळखली जाते.

# आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोठा खुलासा; परदेशातून चालवले जात होते संशयित समाजमाध्यम जाळे


**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सायबरने डिजिटल माध्यमांतील दिशाभूल करणाऱ्या आणि समाजात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयित समाजमाध्यम खात्यांविरोधात मोठी कारवाई सुरू केली आहे. राज्य सरकारच्या या प्रमुख यंत्रणेने केलेल्या तपासात ५०० हून अधिक संशयित समाजमाध्यम खात्यांची ओळख पटविण्यात आली असून, त्यापैकी अनेक खाती भारताबाहेरून चालवली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. महाराष्ट्र सायबरने दिलेल्या माहितीनुसार, आंदोलनाचा गैरफायदा घेत समाजमाध्यमांवर अफवा, दिशाभूल करणारी माहिती, बनावट दृश्यफिती आणि कृत्रिम तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार केलेला खोटा मजकूर मोठ्या प्रमाणावर प्रसारित केला जात होता. यामागे संघटित स्वरूपाचे आंतरराष्ट्रीय जाळे कार्यरत असल्याचा संशय तपासात व्यक्त करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा तपास करण्यासाठी महाराष्ट्र सायबरने मुक्त स्रोतांमधून उपलब्ध माहितीचे विश्लेषण, माहितीचे सखोल परीक्षण, संशयित खात्यांच्या वर्तनाचा अभ्यास तसेच अत्याधुनिक तांत्रिक साधनांचा वापर केला. या तपासातून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या.

तपासात सुमारे १०० समाजमाध्यम खाती भारताबाहेरून, विशेषतः पाकिस्तान आणि पश्चिम आशियातील काही देशांतून चालवली जात असल्याचे आढळून आले. ही खाती आंदोलनाशी संबंधित दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून सामाजिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

यासिवाय, समाजमाध्यमांवरील ४२९ आक्षेपार्ह संदेश, दृश्यफिती आणि खात्यांची ओळख पटविण्यात आली आहे. या संदेशांमध्ये चुकीची माहिती, समाजात संभ्रम निर्माण करणारा मजकूर आणि भडकाऊ स्वरूपाचे साहित्य प्रसारित केल्याचे निदर्शनास आले आहे.




तपासादरम्यान १४० हून अधिक संदेश आणि खात्यांमध्ये कृत्रिम तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट दृश्ये तयार करण्यात आल्याचे उघड झाले. गर्दीचे प्रमाण कृत्रिमरीत्या वाढवून दाखविणारी दृश्ये, बनावट आवाज तयार करून केलेले संदेश तसेच लोकप्रतिनिधींच्या दृश्यफितींमध्ये फेरफार करून तयार केलेल्या बनावट चित्रफितींचाही वापर करण्यात आल्याचे महाराष्ट्र सायबरने स्पष्ट केले आहे. या सर्व संशयित मजकुराची तांत्रिक आणि वैज्ञानिक पद्धतीने पडताळणी करण्यात आली असून, संबंधित समाजमाध्यम व्यासपीठांच्या माध्यमातून तो मजकूर हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. संबंधित खाती बंद करण्यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाहीही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. महाराष्ट्र सायबरने नागरिकांनाही सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही माहिती किंवा दृश्यफीत पाहिल्यानंतर ती तत्काळ पुढे पाठवू नये, प्रथम अधिकृत शासकीय स्रोत किंवा विश्वासार्ह वृत्तसंस्थांकडून तिची पडताळणी करावी आणि खात्री झाल्यानंतरच ती इतरांशी सामायिक करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक सलोखा बिघडविण्याचा, अफवा पसरविण्याचा किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा संघटित डिजिटल जाळ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहील, असा इशाराही महाराष्ट्र सायबरने दिला आहे.

# वाहन सोडवण्यासाठी २० हजारांची लाच

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यभरात लाचखोरीविरोधात सुरू असलेल्या कारवायांमध्ये आणखी एका प्रकरणाचा पर्दाफाश झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती वनपरिक्षेत्र कार्यालयातील वनपाल, वनरक्षक आणि एका खासगी व्यक्तीला वाहन सोडवून देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.

या कारवाईमुळे वन विभागात खळबळ उडाली असून तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने घराच्या बांधकामासाठी ट्रॅक्टरमधून वाळूची वाहतूक केली होती. ही वाहतूक नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भद्रावती वनपरिक्षेत्राच्या पथकाने संबंधित ट्रॅक्टर जप्त करून त्याच्यावर कारवाई केली. कारवाईनंतर जप्त करण्यात आलेले वाहन लवकर सोडवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. वनपाल कोमल घुगलोत आणि वनरक्षक संदीप पारवे यांनी ही रक्कम मागितल्याचे तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे कळविले. तक्रार प्राप्त होताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संपूर्ण प्रकरणाची पडताळणी केली.




तक्रारीतील तथ्य स्पष्ट झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने लाचेची रक्कम देण्यास गेल्यानंतर ती स्वीकारताना वनपाल कोमल घुगलोत, वनरक्षक संदीप पारवे आणि रक्कम स्वीकारण्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करणारा खासगी व्यक्ती ललित नागपुरे यांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले. कारवाईनंतर तिन्ही आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

राज्यात शासकीय कार्यालयांतील लाचखोरी रोखण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सातत्याने कारवाया सुरू आहेत. शिपायांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांवर कारवाई करण्यात आली असून, कोणत्याही परिस्थितीत लाच मागितल्यास नागरिकांनी त्वरित तक्रार करण्याचे आवाहन विभागाने पुन्हा एकदा केले.

## थोडक्यात

### प्रेमसंबंधांना विरोध; आईनेच १९ वर्षीय मुलीची गळा आवळून हत्या

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथे आईनेच आपल्या १९ वर्षीय मुलीची गळा आवळून हत्या केल्याची अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घराशेजारी राहणाऱ्या तरुणासोबत असलेल्या प्रेमसंबंधांना विरोध होत असल्याने आईने संतापाच्या भरात हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी उल्हासनगर पोलिस ठाणे क्रमांक एकच्या पोलिसांनी आरोपी आई आशा गरड हिला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उल्हासनगर-१ परिसरातील भैय्यासाहेब आंबेडकर नगर येथे आशा गरड आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. त्यांची मुलगी अमृता गरड हिचे घराशेजारी राहणाऱ्या एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. या संबंधाला तिच्या आईचा सुरुवातीपासूनच तीव्र विरोध होता. याच कारणावरून घरात वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे.

मंगळवारी रात्री पुन्हा एकदा आई आणि मुलीमध्ये या विषयावरून जोरदार वाद झाला. त्यावेळी घरातील इतर सदस्य झोपलेले होते. अमृताचे वडील तसेच तिचे दोन भाऊ घरातच होते. वाद वाढल्यानंतर अमृता घर सोडून जाण्याच्या तयारीत होती. यामुळे संतापलेल्या आईने रागाच्या भरात ओढणीच्या साहाय्याने मुलीचा गळा आवळला.

गळा आवळल्यामुळे अमृता गंभीर जखमी झाली आणि तिचा जागीच मृत्यू झाला. ही घटना घडल्यानंतर घरातील वातावरण एकच गोंधळाचे झाले. त्यानंतर अमृताच्या वडिलांनी स्वतः उल्हासनगर पोलिस ठाणे क्रमांक एक येथे जाऊन संपूर्ण घटनेची माहिती पोलिसांना दिली.

माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. प्राथमिक तपासानंतर आरोपी आई आशा गरड हिला ताब्यात घेऊन तिच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर तिला अटक करण्यात आली.

या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून प्रेमसंबंधांना विरोधातून एका आईने स्वतःच्या मुलीचा जीव घेतल्याने नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पोलिस या प्रकरणातील सर्व पैलूंची कसून चौकशी करत असून घटनेमागील नेमके कारण, वादाचे स्वरूप आणि इतर परिस्थितीचा सखोल तपास सुरू आहे.

### भाजीपाल्याच्या आडून खैर लाकडाची तस्करी

**पालघर । प्रतिनिधी**

वसई-विरार परिसरात खैर वृक्षांच्या अवैध तोडी आणि तस्करीचे प्रकार पुन्हा एकदा समोर आले असून, भाजीपाल्याच्या वाहतुकीचा आडोसा घेत खैर लाकडाची तस्करी करणाऱ्यांचा वन विभागाने पर्दाफाश केला आहे. वसईच्या भाताणे वनक्षेत्रातील मेढे परिसरात वन विभागाने केलेल्या धाडसी कारवाईत खैर लाकडाने भरलेले वाहन जप्त करण्यात आले. मात्र, अंधाराचा फायदा घेत चालक घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वसई पूर्वेतील मेढे परिसरातून खैर जातीच्या लाकडाची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची खात्रीशीर माहिती वन विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वन अधिकाऱ्यांनी तातडीने परिसरात विशेष नाकाबंदी करून संशयित वाहनांवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली.

पहाटेच्या सुमारास एक संशयास्पद मालवाहू वाहन तेथून येताना दिसले. वन कर्मचाऱ्यांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिला. मात्र, चालकाने आदेशाकडे दुर्लक्ष करत वाहनाचा वेग वाढवून तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने सुमारे सात ते आठ किलोमीटरपर्यंत वाहनाचा पाठलाग केला. अखेर वाहन अडविण्यात वन कर्मचाऱ्यांना यश आले. मात्र, वाहन थांबताच चालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला.

यानंतर वाहनाची सखोल झडती घेतली असता वरच्या बाजूला भाजीपाला ठेवण्यात आला होता, तर त्याखाली अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने खैर जातीच्या लाकडाचे ओंडके लपवून ठेवण्यात आले होते.

# घोरपड या वन्य जीवाची शिकाऱ्याच्या तावडीतून सुटका

## घोरपड ही शेड्युल एकमधील संरक्षित व महत्त्वपूर्ण वन्यजीवात; नैसर्गिक अधिवासात मुक्तता

**दिलीप शिंदे । सोयगाव**

सिल्लोड शहरालगत छत्तीस एकर परिसरातील एका झोपडीजवळ पिशवीत जिवंत घोरपड घेऊन विक्रीच्या उद्देशाने एका ग्राहकाची वाट पाहत उभ्या असलेल्या व्यक्तीचा प्रकार उघडकीस आला. वन्यजीव संवर्धक डॉ. संतोष पाटील यांच्या सतर्कतेमुळे ही घोरपड सुरक्षितपणे वनविभागाच्या ताब्यात घेऊन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. संतोष पाटील हे या मार्गाने जात असताना परिसरातील एका व्यक्तीने संबंधित व्यक्तीकडे विक्रीसाठी जिवंत घोरपड असल्याची माहिती दिली. त्यांनी तात्काळ खातरजमा करून सिल्लोड प्रादेशिक वन विभागाचे प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी शेषराव तांबे यांना घटनेची माहिती दिली.

त्यानंतर वनरक्षक साईनाथ पवार व विलास नरवाडे यांच्या मदतीने संबंधित व्यक्तीकडून जिवंत घोरपड ताब्यात घेण्यात आली. वनविभागाच्या पथकाने घोरपडीला तातडीने राखीव वनक्षेत्रात नेऊन तिच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. संबंधित वृद्ध व्यक्तीस वन्यजीवांची शिकार अथवा विक्री करणे हा कायद्याने गुन्हा असल्याची समज देण्यात आली. भविष्यात अशा प्रकारची शिकार केल्यास वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही वन अधिकाऱ्यांनी दिला.

डॉ. संतोष पाटील यांनी सांगितले की, गेल्या दहा वर्षांत त्यांनी शिकाऱ्यांच्या तावडीतून सात जिवंत घोरपडींची सुटका करून त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडले आहे. तसेच गेल्या सात वर्षांपासून यशवंती वाचली पाहिजे हा राज्यव्यापी जनजागृती उपक्रम राबवून अनेक शिकाऱ्यांना वन्यजीवांची शिकार करण्यापासून परावृत्त करण्यात यश आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातील यशवंती या घोरपडीचा उल्लेख सर्वश्रुत असून, त्याच प्रेरणेतून हा संवर्धन उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. घोरपड हा जैवविविधतेतील आणि अन्नसाखळीतील अत्यंत महत्त्वाचा दुवा असून ती लहान-मोठे साप, बेडूक, सरडे आदी प्राण्यांवर उदरनिर्वाह करते. विशेषतः



घोणस सापाची शिकार घोरपडीकडून मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्यामुळे घोरपडींची संख्या घटल्याने घोणससह इतर सापांची संख्या वाढत असल्याचे निरीक्षण त्यांनी मांडले.

घोरपडीच्या चोरट्या शिकारीमुळे तिची संख्या सातत्याने कमी होत असून त्याचा परिणाम संपूर्ण पर्यावरणीय संतुलनावर होत आहे. केवळ पाठीचे दुखणे बरे होते किंवा लैंगिक शक्ती वाढते, या तथ्यहीन समजुतींमुळे विशेषतः पावसाळ्यात घोरपडींची मोठ्या प्रमाणावर हत्या केली जात असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, सिल्लोडसह जिल्ह्यातील सर्व हॉटेल, ढाबे चालक आणि मांस विक्रेत्यांना दरवर्षीप्रमाणे यंदाही आवाहन करण्यात आले आहे. कोणी घोरपड कापण्यासाठी अथवा शिजवून देण्यासाठी आणल्यास त्यास स्पष्ट नकार देऊन तात्काळ वनविभाग किंवा स्वतः डॉ. संतोष पाटील यांना माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# घनसावंगी पंचायत समितीत ऊसतोड कामगारांना स्मार्ट कार्डांचे वितरण

**घनसावंगी । प्रतिनिधी**



पंचायत समिती, घनसावंगी येथे गटविकास अधिकारी सौ. प्रगती इंगोले यांच्या प्रमुख उपस्थितीत ऊसतोड कामगारांना स्मार्ट कार्डांचे वितरण करण्यात आले.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून घनसावंगी तालुक्यातील १५ व परतूर तालुक्यातील १५ अशा एकूण ३० गावांमध्ये ऊसतोड कामगार कुटुंबातील महिला व मुलांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण, पोषण आणि सुरक्षित स्थलांतर या विषयांवर प्रकल्प राबविण्यात येत आहे.

यावेळी संबंधित गावांचे ग्रामसेवक, ऊसतोड कामगार तसेच प्रकल्प कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत ऊसतोड कामगारांचे स्थलांतर होण्यापूर्वी नोंदणी करणे, स्मार्ट कार्ड व ओळखपत्रांचे वितरण करणे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र कामगारांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक समन्वय साधण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी गटविकास अधिकारी सौ. प्रगती इंगोले, पी. पी. खिल्लारे, विस्तार अधिकारी एल. पी. नागलवार, जिल्हा समन्वयक एकनाथ राऊत, राजेश वाघमारे यांच्यासह ऊसतोड कामगार आणि ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांची अधिकृत नोंदणी सुलभ होण्यास, सुरक्षित स्थलांतरास चालना मिळण्यास तसेच शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# देळेगव्हाण ग्रामपंचायतीकडून वृक्षारोपण

## अंगणवाडीच्या कामाचे गटविकास अधिकाऱ्यांकडून कौतुक

**विष्णु मगर । टेंभुर्णी**

जाफ्राबाद तालुक्यातील देळेगव्हाण ग्रामपंचायतीच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अंगणवाडीच्या आवारात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात गटविकास अधिकारी श्री. बारगिले यांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित, विस्तार अधिकारी श्री. जायेभाये, ग्रामविकास अधिकारी एस. बी. शिंदे, सरपंच रामकिसन कापसे, ग्रामपंचायत सदस्य तुळशीराम गाढवे, शिवाजी भिसे, संतोष हिवाळे, प्रमोद कापसे, गणेश निलक, सचिन निलक, सहदेव बनकर, शिवाजी बनकर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वृक्षारोपणानंतर गटविकास अधिकारी श्री. बारगिले यांनी देळेगव्हाण येथील अंगणवाडीला भेट देऊन तेथील शैक्षणिक व पोषणविषयक कामकाजाची पाहणी केली. अंगणवाडीतील स्वच्छता, बालकांसाठी उपलब्ध सुविधा तसेच सेविकेने केलेल्या कार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत तिच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी चिमुकल्यांसाठी तयार करण्यात आलेल्या पूरक आहाराचीही त्यांनी चव घेऊन त्याच्या गुणवत्तेची प्रशंसा केली.

पर्यावरण संरक्षणासोबतच बालकांच्या आरोग्य व पोषणाबाबत अंगणवाडीमध्ये सुरू असलेल्या उपक्रमांचे उपस्थितांनी स्वागत केले. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमातून वृक्षसंवर्धनाचा संदेश देतानाच बालविकासालाही प्राधान्य दिल्याचे अधोरेखित झाले.

# आरपीएफ नांदेड विभागाची सुरक्षा मोहीम प्रभावी

## चोरीचे गुन्हे उघडकीस, प्रवाशांचा मुद्देमाल परत, दोन अल्पवयीनांची सुटका

**नांदेड । प्रतिनिधी**

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) प्रवाशांची सुरक्षा, रेल्वे मालमत्तेचे संरक्षण आणि रेल्वे परिसरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी राबविलेल्या विविध विशेष मोहिमांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ऑपरेशन यात्री सुरक्षा, ऑपरेशन अमानत, ऑपरेशन रेल सुरक्षा आणि ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत आरपीएफने जीआरपी व स्थानिक पोलिसांच्या समन्वयाने अनेक महत्त्वपूर्ण कारवाया करून आरोपींना जेरबंद केले, चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आणि प्रवाशांचा विश्वास संपादन केला आहे.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत छत्रपती संभाजीनगर, परभणी, वाशीम आणि हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकांवर संयुक्त कारवाई करत प्रवाशांच्या मालमत्तेवर डल्ला मारण्याच्या तयारीत असलेल्या पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आले. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, भारतीय न्याय सुरक्षा संहिता (बीएनएसएस) आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात आली.

हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर मोबाईल चोरी करणाऱ्या एका आरोपीला आरपीएफने अटक केली. त्याच्या कबुलीजबाबावरून



२५ हजार किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला. त्यानंतर संबंधित प्रवाशाचा शोध घेऊन मोबाईल सुरक्षितपणे परत करण्यात आला.

ऑपरेशन रेल सुरक्षा अंतर्गत नांदेड रेल्वे यार्डमध्ये उभ्या असलेल्या टॉवर कारमधून तांब्याची कॅटनरी वायर चोरी झाल्याचा गुन्हा उघडकीस आणण्यात आला. सीसीटीव्ही चित्रफीत, गुप्त माहिती आणि सातत्यपूर्ण पाळतीच्या आधारे आरपीएफने एका रिसिव्हरसह चार आरोपींना अटक केली. या कारवाईत २०,२५० किमतीची चोरीस गेलेली संपूर्ण रेल्वे मालमत्ता आणि तिच्या विक्रीतून मिळालेली रक्कम जप्त करण्यात आली. त्यामुळे चोरीच्या मालाची शंभर टक्के वसुली करण्यात यश मिळाले.

ऑपरेशन अमानत अंतर्गत रेलमदत तक्रारीवर तातडीने प्रतिसाद देत नांदिग्राम एक्स्प्रेसमध्ये एका प्रवाशाचा विसरलेला डेल कंपनीचा सुमारे ३५ हजार किमतीचा लॅपटॉप सुरक्षित ताब्यात घेण्यात आला. आवश्यक पडताळणीनंतर तो लॅपटॉप संबंधित मालकाकडे सुपूर्द करण्यात आला.

### मद्यधुंद तरुणाचा पोलिस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला; आरोपी अटकेत

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील कल्याण पश्चिम परिसरातील गौरीपाडा भागात कर्तव्य बजावत असलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्यावर मद्यधुंद तरुणाने काठी, ठोसे आणि चाकूच्या साहाय्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या संपूर्ण घटनेचे चित्रण परिसरातील बंदिस्त चित्रण यंत्रणेत कैद झाले असून त्याचा दृकश्राव्य प्रसंग समोर आल्यानंतर मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी खडकपाडा पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याच्याविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल तायडे हा तरुण मद्यधुंद अवस्थेत गौरीपाडा परिसरातील नागरिकांच्या घराबाहेर उभा राहून आरडाओरड करत होता. त्याच्या या वर्तनामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर नागरिकांनी तातडीच्या पोलिस मदत क्रमांकावर संपर्क साधून याबाबत माहिती दिली.

तक्रार प्राप्त होताच खडकपाडा पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी गणेश चव्हाण घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीची पाहणी करून राहुल तायडे याला शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यावेळी आरोपीने पोलिस कर्मचाऱ्याशी वाद घालण्यास सुरुवात केली आणि काही क्षणांतच त्याचा राग अनावर झाला.

# समुद्रकिनाऱ्यावर तस्करीला मोठा धक्का

## अलिबागमध्ये ४ कोटींचे अंबरग्रीस हस्तगत; अलिबाग पोलिसांची कारवाई; वन्यजीव तस्करीच्या संभाव्य रॅकेटचा तपास सुरू

**निलेश फुंडे । रेवदंडा**

रायगड पोलिसांनी किनारपट्टी सुरक्षा मोहिमेदरम्यान धडाकेबाज कारवाई करत तब्बल चार कोटी रुपयांहून अधिक बाजारमूल्याचे अंबरग्रीस जप्त करून वन्यजीव तस्करीच्या संभाव्य रॅकेटला मोठा धक्का दिला आहे. अलिबाग तालुक्यातील चाळमाळा जेटीजवळ करण्यात आलेल्या या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून अंबरग्रीससह दुचाकीही जप्त करण्यात आली आहे.

रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या संपूर्ण किनारपट्टी भागात विशेष गस्त, नाकाबंदी आणि संशयित हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेचा भाग म्हणून अलिबाग पोलिसांचे विशेष पथक २६ जुलैच्या मध्यरात्री चाळमाळा जेटी परिसरात गस्त घालत असताना एका दुचाकीस्वाराची संशयास्पद हालचाल त्यांच्या निदर्शनास आली.पोलिसांनी तत्काळ संबंधित व्यक्तीला अडवून चौकशी केली असता त्याची ओळख राहुल पंढरीनाथ हातणी (वय ३३, रा. चाळमाळा, ता. अलिबाग) अशी पटली. त्याच्या वागणुकीत संशय निर्माण झाल्याने पोलिसांनी दुचाकीची सखोल तपासणी केली. यावेळी दुचाकीच्या डिकीत ठेवलेल्या कपडी पिशवीतून सुमारे चार किलो वजनाचा अंबरग्रीससदृश पदार्थ आढळून आला.

तज्ज्ञांच्या प्राथमिक अंदाजानुसार जप्त करण्यात आलेल्या अंबरग्रीसची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत सुमारे चार कोटी रुपये इतकी आहे. याशिवाय आरोपीकडील एमएच-०६ बीझेड-६३४१ क्रमांकाची क्विव्हा दुचाकीही जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ४ कोटी २५ हजार रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### अंबरग्रीस म्हणजे नेमके काय?

अंबरग्रीस हा अत्यंत दुर्मिळ आणि मौल्यवान पदार्थ असून तो स्पर्म व्हेल या संरक्षित सागरी जीवाशी संबंधित असतो. सुगंधी द्रव्ये, परफ्यूम उद्योग आणि काही विशेष उत्पादनांमध्ये त्याला मोठी मागणी असते. याच कारणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची मोठ्या प्रमाणात तस्करी केली जाते. भारतात मात्र अंबरग्रीसची बाळगणूक, खरेदी-विक्री, वाहतूक अथवा साठवणूक करणे हे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गंभीर आणि दंडनीय गुन्हा मानला जातो.

### वन विभागाकडे सोपवला आरोपी

पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाईसाठी वन विभाग, अलिबाग यांच्या



स्वाधीन केले आहे. आता या अंबरग्रीसचा स्रोत, त्यामागील संभाव्य तस्करीचे जाळे आणि या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास वन विभाग आणि संबंधित यंत्रणांकडून करण्यात येणार आहे.

### किनारपट्टीवरील तस्करीविरोधात पोलिसांचा सजग पहारा

रायगडची विस्तीर्ण समुद्रकिनारपट्टी लक्षात घेता पोलिसांनी किनारी भागात गस्त आणि गुप्त माहिती संकलनाची मोहीम अधिक तीव्र केली आहे. या कारवाईमुळे समुद्रमार्गे होणाऱ्या बेकायदेशीर व्यापार, वन्यजीव तस्करी आणि इतर गुन्हेगारी कारवायांवर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या यशस्वी कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्यासह अलिबाग पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### नागरिकांना पोलिसांचे आवाहन

समुद्रकिनारी, खाड्यांमध्ये किंवा अन्यत्र अंबरग्रीससारखा संशयास्पद पदार्थ आढळल्यास तो स्वतःजवळ न ठेवता अथवा त्याची विक्री, खरेदी किंवा वाहतूक करण्याचा प्रयत्न न करता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा वन विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन रायगड पोलिसांनी केले आहे.

This letter is issued by the **Owner Pooja Vishal Ugale** and the **printer, publisher Achut Dagdu More** Printed at Jagamitra Offset Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna Taluka and District Jalna - 431203 (Maharashtra) And Published at Office Dainik Shubh Prabhat, H.No. 327, Om Shanti Galli, Near Mammadevi Kirana Store, Sambhaji Nagar Jalna, Taluka and District Jalna - 431203 (MAHARASHTRA) Editor **Achut Dagdu More,** Mob. No. 7020871500, **E-mail : dainikshubhprabhat@gmail.com PRGI Registration Number - MHMAR/25/A1228**

**हे पत्र मालक पूजा विशाल उगले आणि मुद्रक, प्रकाशक अच्युत दगडू मोरे यांनी जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजी नगर जालना, तालुका जिल्हा जालना - ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक शुभ प्रभात, घर नं. ३२७, मंम्मादेवी किराणा जवळ, ओम शांती गल्ली, संभाजी नगर, जालना. तालुका आणि जिल्हा जालना-४३१२०३ (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. संपादक : अच्युत दगडू मोरे, मो.नं. ९८५०५१६७२४, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1228, E-mail : dainikshubhprabhat@gmail.com**

# पीआर कार्ड नव्हे तर मोजणी प्रमाणपत्र वाटप

## दावा करणाऱ्यांनी अगोदर नीट अभ्यास करावा; माजी आमदार कैलास गोरंटयाल यांचा खोतकरांना खोचक टोला

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील झोपडपट्टी धारकांना मोजणी प्रमाणपत्र वितरीत होत असतांना पीआर कार्डचे स्वप्न साकार झाल्याचा अजब दावा करत स्वतःची पाठ थोपटून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करणाऱ्या विद्यमान आमदारांनी अगोदर प्रशासकीय कामकाजाचा नीट अभ्यास करावा असा खोचक टोला माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी नामोल्लेख न करता आ.अर्जुन खोतकर यांना लगावला आहे.

जालन्यातील मुक्तेश्वर लॉन्स येथे रविवारी जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान कार्यक्रमात जालना मनपाच्या महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते शहरातील झोपडपट्टी भागातील काही रहिवाश्यांना प्रातिनिधिक स्वरूपात जागा मोजणी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मात्र, विद्यमान आमदारांनी चक्क पीआर कार्ड वाटप केल्याचा कांगावा करत, आपल्या पाठपुराव्याला यश आले असा अजब दावा करून फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केल्यामुळे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी त्यांचा नामोल्लेख न करता सडकून टीका केली आहे. गोरंटयाल म्हणाले की,जालना शहरात जवळपास ४२ पेक्षा अधिक झोपडपट्ट्या असून त्या ठिकाणी हजारो गरीब कुटुंब मागील अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. घर आहे, पण पीआर कार्ड नसल्यामुळे



या सर्वच झोपडपट्ट्या मधील कुटुंबांना सरकारच्या विविध योजनांच्या लाभासह बँक कर्जापासून वंचित रहावे लागते ही बाब आपण स्वतः तसेच माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पा.दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे,आ.संतोष दानवे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे आदींनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून दिली होती. सर्वच झोपडपट्टी धारकांना त्यांच्या घराचे हक्काचे पीआर कार्ड मिळाले पाहिजे अशी आग्रही भूमिका मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांकडे मांडण्यात आली होती. शिवाय याच अनुषंगाने आपण दि.२५ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले होते. विशेष म्हणजे आपण दिलेल्या निवेदनाची तातडीने दखल घेत त्याच निवेदनावर जालन्यातील सर्वच झोपडपट्टी धारकांचे त्वरित सर्वेक्षण सुरू करण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी देखील या प्रकरणी त्वरित निर्णय घेत जालना मनपाला सर्वेक्षण करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार जालना मनपाने नागपूर येथील सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या एजन्सीची निवड करून त्यांना दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी जालन्यातील सर्वच झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे सर्वेक्षण करण्यासाठी कार्यारंभ आदेश दिल्याचे सांगून माजी आमदार कैलास गोरंटयाल म्हणाले की, या सर्वेक्षणाचा शुभारंभ राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री तथा जालन्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंढे यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत चंदनझिरा येथे करण्यात आल्याचे नमूद केले. सर्वेक्षणासह जागेची मोजणी पूर्ण झाली असून ज्यांच्या जागेची मोजणी झाली त्यांना जालना मनपातर्फे मोजणी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येत आहे. झोपडपट्टी धारकांना पीआर कार्ड मिळावे या मागणीसह मुख्यमंत्री, महसूलमंत्री ते प्रशासकीय यंत्रणा अशा सर्व पातळ्यांवर आपण आणि भाजपाच्या सर्वच प्रमुख नेत्यांनी पाठपुरावा करून झोपडपट्टी धारकांना त्यांच्या हक्काच्या घराचे पीआर कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले असतांना, आपल्या पाठपुराव्याला यश, झोपडपट्टी धारकांना हक्काचे पीआर कार्ड मिळणार असा करणाऱ्या विद्यमान आमदारांची माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी चांगलीच खिल्ली उडविली आहे.

### महसूल मंत्र्यांच्या उपस्थितीत होणार पीआर कार्डचे वितरण

शहरातील जवळपास सर्वच झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे सर्वेक्षण व जागा मोजणीचे काम पूर्ण झाले आहे. जागा मोजणी बाबतचा अहवाल जालना मनपातर्फे लवकरच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी या कार्यालयाकडे सादर करण्यात येणार असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले. या अहवालाची तपासणी केल्यानंतर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी यांच्या मान्यतेनंतर तालुका उपअधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी जालना या कार्यालयामार्फत पीआर कार्ड तयार करण्यात येणार असून सदर पीआर कार्ड तयार झाल्यानंतर जालना मनपातर्फे व्यापक कार्यक्रमाचे आयोजन करून त्यात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष दानवे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झोपडपट्टी धारकांना पीआर कार्डचे अधिकृतपणे वाटप करण्यात येणार असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

## थोडक्यात

### अंबरनाथमध्ये क्रौर्याची परिसीमा; बाराव्या मजल्यावरून मांजरीला खाली ढकलून ठार

**ठाणे । प्रतिनिधी**

अंबरनाथ पूर्वेतील पालेगाव परिसरात माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका व्यक्तीने बाराव्या मजल्यावरून एका निष्पाप मांजरीला जाणीवपूर्वक खाली ढकलून तिचा जीव घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही संपूर्ण घटना इमारतीतील बंदिस्त चित्रण यंत्रणेत कैद झाली असून, त्याचा दृक्श्राव्य प्रसंग समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून संबंधित व्यक्तीविरुद्ध प्राणी संरक्षण कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबरनाथ पूर्वेतील पालेगाव येथील रॉयल फ्लोरा इमारतीच्या 'अ' विभागातील बाराव्या मजल्यावर रविवारी सायंकाळी सुमारे पावणेसहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. त्यावेळी एक मांजर इमारतीतील डक्टच्या भिंतीवरून सावधपणे चालत होती. परिसरात कोणाचाही वावर नसल्याने ती निवांतपणे पुढे जात होती.

याच वेळी एक व्यक्ती दबक्या पावलांनी तेथे आला. दृक्श्राव्य चित्रणात तो वयस्कर असल्याचे दिसत असून त्याच्या हातात रुमालही असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तो हळूहळू मांजरीच्या दिशेने पुढे सरकतो. त्याची चाहूल लागताच मांजर घाबरल्याचेही चित्रणात दिसते. काही क्षणांतच त्या व्यक्तीने मांजरीला जोराने ढकलून दिले. त्यामुळे मांजर थेट बाराव्या मजल्यावरून खाली कोसळली.

विशेष म्हणजे मांजर खाली पडली की नाही, याची खात्री करण्यासाठी संबंधित व्यक्तीने खाली वाकून पाहिले आणि त्यानंतर कोणतीही भावना न दाखवता तेथून निघून गेला. या घटनेत मांजरीचा जागीच मृत्यू झाला.

घटना सकाळच्या किंवा सायंकाळच्या शांत वेळेत घडल्याने त्या वेळी मजल्यावरील सर्व घरांचे दरवाजे बंद होते. त्यामुळे कोणाच्याही लक्षात हा प्रकार तत्काळ आला नाही. मात्र बंदिस्त चित्रण यंत्रणेतील दृश्ये तपासल्यानंतर संपूर्ण प्रकार उघड झाला.

ही घटना समोर येताच इमारतीतील रहिवासी आणि परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. निष्पाप प्राण्यावरील अशा क्रूर व अमानुष कृत्याचा सर्व स्तरांतून निषेध होत असून संबंधित व्यक्तीची ओळख पटवून त्याच्याविरुद्ध प्राणी संरक्षण कायद्यानुसार कठोर गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे.

सध्या संबंधित व्यक्तीने हे कृत्य नेमके कोणत्या कारणामुळे केले, याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. या घटनेचा दृक्श्राव्य प्रसंग समाजमाध्यमांवर वेगाने प्रसारित होत असून, आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे. तसेच या प्रकरणाचा सखोल तपास करून संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्राणीप्रेमी संस्था आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### राजश्री शाहू महाराज संस्थेच्या वतीने हेल्थ कार्डचे वितरण

**सोयगाव । दिलीप शिंदे**

सोयगाव तालुक्यातील शिंदोळ येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये दि.२७ सोमवारी छत्रपती शाहू महाराज संस्थेच्या वतीने फॅमिली हेल्थ कार्डाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास सोयगाव पंचायत समितीच्या उप सभापती गयाबाई गोविंद घोडे , गोविंद निंबा घोडे, शिंदोळ गावच्या सरपंच कल्पनाबाई तुकाराम बोरसे यांची प्रमुख उपस्थिती होती. वाटप केलेल्या कार्ड मुळे गावातील शेतकरी, मजूरवर्ग, गरीब,गरजू नागरिकांना फॅमिली हेल्थ कार्डमुळे खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारांमध्ये लागणाऱ्या बिलांमध्ये कमीत कमी २०% ते जास्तीत जास्त ५०% टक्क्यांपर्यंत सूट मिळणार आहे. यात ओपीडी, आईपीडी, ऑपरेशन, एक्स-रे, सोनोग्राफी, रक्त तपासणी, अति दक्षता, बालरोग तज्ज्ञ, स्त्रि-रोग तज्ज्ञ, दंत रोग तज्ज्ञ, नेत्र विकार तज्ज्ञ, आदींना समाविष्ट करण्यात आले आहे. फॅमिली हेल्थ कार्डचे सभासद नोंदणी शिबिर नुकतेच शिंदोळ येथे घेण्यात आले.

या शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला. या प्रसंगी आर.के. एस. एस.पाटील, एम. के.साळवी, प्रमोद यशवंत सोनवणे, एस.पी.मोरे, छोट्याबाई कैलास मोचिंतामण प्रल्हाद सोनवणे, पा.पू. विजय सोनवणे आदींसह गावकरी उपस्थित होते.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त परतूरात सेवाभावी उपक्रमांची अनोखी भेट

## रुग्णांना फळवाटप, स्नेहांकुर आश्रमात किराणा किटचे वितरण

**परतूर । प्रतिनिधी**



शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त परतूर येथे विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिकांनी सामाजिक बांधिलकी जपत हा वाढदिवस उत्साहात साजरा केला.

यावेळी शासकीय रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच स्नेहांकुर आश्रमातील गरजू व निराधार लाभार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंच्या किराणा किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून सेवा हाच खरा उत्सव हा संदेश देण्यात आला.


याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी उद्धव ठाकरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व निरोगी आयुष्यासाठी प्रार्थना केली. तसेच भविष्यातही अशा सामाजिक व सेवाभावी उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास तालुकाप्रमुख भारत पंडित, उपतालुकाप्रमुख रामचंद्र काळे, नगरसेवक दीपक कदम, दलित आघाडी प्रमुख मधुकर पाईकराव, शहरप्रमुख दत्ता सुरूंग, राहुल कदम, प्रभाकर खंदारे, गणेश गायवळ, इब्राहिम कायमखानी, गोविंद मुंदडा, गजानन मस्के, नागेश चिखले, सुरेश भंडारी, संदीप पाचारे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ड्रग्ज माफियांवर मानवत पोलिसांची मोठी कारवाई

## १४.६४ लाखांचा एम.डी. ड्रग्ज जप्त,दोघांना अटक

**परभणी । विलास बारहाते**



परभणी जिल्ह्यातील मानवत पोलिसांची मोठी कारवाई तालुक्यातील रत्नापूर शिवारात केली पोलिसांनी २७ जुलै रोजी मध्यरात्री कारवाई अंमली पदार्थांचा अवैध व्यापार करणाऱ्याच्या विरोधात मानवत पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत ड्रग्ज माफियांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखाली आणि मानवत पोलीस स्टेशनचे सहपोलीस निरीक्षक दर्शन शिंदे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे (एलसीबी) सरोदे यांच्या नियोजनबद्ध कारवाईत तब्बल १४ लाख ६४ हजार ४०० किंमती चा एम.डी. (मेफेड्रोन) अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. या कारवाईने ड्रग्जच्या काळ्या साम्राज्याला मोठा हादरा बसला आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी अत्यंत शिताफीने सापळा रचत दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून ७३ ग्रॅम २२० मिलीग्रॅम एम.डी. अंमली पदार्थ आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या तीन स्कुटी जप्त करण्यात आल्या.या कारवाईत अलीम शेख खाजा रा. नायरा पेट्रोल पंपजवळ, पाथरी आणि शाहरुख फिरोजखान पठाण रा. रविवार पेठ, अंबाजोगाई यांना ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या अवैध साखळीवर मोठा आघात झाल्याचे मानले जात आहे.

मानवत पोलिसांनी अल्पावधीत केलेली ही मोठी कारवाई म्हणजे केवळ जप्ती नव्हे, तर समाजातील युवकांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या ड्रग्ज रॅकेट विरुद्ध उभारलेला कठोर लढा असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. या प्रकरणी संबंधित आरोपीं विरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तींना स्पष्ट इशारा मिळाला असून, कायद्याचा धाक निर्माण करण्यात मानवत पोलिसांना मोठे यश मिळाले आहे.या उल्लेखनीय कामगिरी बद्दल पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक दर्शन शिंदे, एल.सी.बी. अधिकारी सरोदे आणि कारवाईत सहभागी संपूर्ण पोलीस पथकावर वर्षाव होत आहे.

# एससी उपवर्गीकरणाविरोधात जाफ्राबादमध्ये महाजनआक्रोश मोर्चा

### साखळी उपोषणाचा ४१ वा दिवस; दहा हजारांहून अधिक नागरिक सहभागी होण्याची शक्यता

**जाफ्राबाद । हरी भालके**




अनुसूचित जाती (एससी) आरक्षणातील अ, ब, क, ड उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी जाफ्राबाद तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषणाचा ४१ वा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर दि. २८ जुलै रोजी जाफ्राबाद येथे महाजनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौकातून मोर्चाला सुरुवात होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे नगरपंचायतीसमोरील प्रांगणात सभेत रूपांतर होणार आहे.

मोर्चात जिल्ह्यातील ५९ अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींसह दहा हजारांहून अधिक महिला-पुरुष सहभागी होण्याची शक्यता आहे.

सिद्धार्थ शिनगारे, प्रा. डॉ. ह. नी. सोनकांबळे, अजय सरोदे, दादासाहेब शेळके, सिद्धार्थ सुरडकर व रुक्मिण लोंढे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रशासनाच्या वतीने तहसीलदार तथा एसडीएम निवेदन स्वीकारणार आहेत.

मोर्चा शांततापूर्ण व शिस्तबद्ध पार पडावा यासाठी सुमारे ५०० समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे. वाहनांसाठी बीएसएनएल कार्यालयाजवळ पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून, सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन एससी उपवर्गीकरण विरोधी समन्वय समितीने केले आहे.
या आंदोलनासाठी पोलीस बंदोबस्त देण्यात आला आहे.

# परतूरच्या लायन महेश होलाणी यांना 'मेलविन जोन्स फेलो'चा जागतिक सन्मान

## माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ए. पी. सिंग यांच्या हस्ते गौरव

**परतूर । प्रतिनिधी**




लायन्स क्लब ऑफ परतूरचे अध्यक्ष लायन महेश होलाणी यांना लायन्स क्लब इंटरनॅशनलचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'मेलविन जोन्स फेलो (एमजेएफ)' हा आंतरराष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या प्रांत कॅबिनेट कार्यकारिणी शपथविधी सोहळ्यात माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष लायन ए. पी. सिंग यांच्या हस्ते त्यांना एमजेएफ प्रमाणपत्र व मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

लायन महेश होलाणी यांनी लायन्स क्लब ऑफ परतूरच्या माध्यमातून आरोग्य सेवा, गरजू व वंचितांना मदत, विविध समाजोपयोगी उपक्रम आणि जनकल्याणकारी प्रकल्पांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या सेवाभावी कार्याची, प्रभावी नेतृत्वाची आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची दखल घेत हा जागतिक सन्मान देण्यात आला.

या सोहळ्यास प्रांतपाल राहुल औसेकर, माजी आंतरराष्ट्रीय संचालक डॉ. नवल मालू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महेश होलाणी यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल परतूर, जालना जिल्हा तसेच लायन्स परिवारातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांची कामगिरी समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# रायगड जिल्हा परिषदेत 'माहितीबंदी'चा फतवा

## पत्रकारितेला लगाम घालण्याचा प्रयत्न? अध्यक्षांच्या परवानगीशिवाय माध्यमांशी बोलण्यास मनाई

**निलेश फुंडे । रेवदंडा**

रायगड जिल्हा परिषद प्रशासनाने काढलेल्या एका वादग्रस्त परिपत्रकामुळे जिल्हाभरात खळबळ उडाली असून, या निर्णयामुळे प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी केला आहे. लोकशाहीत माहितीवर कुलूप लावण्याचा हा प्रयत्न आहे का? असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार दाखल करून संबंधित परिपत्रक तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या पत्रानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिनांक २२ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकात अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही अधिकारी, खातेप्रमुख किंवा पदाधिकाऱ्याने प्रसारमाध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया अथवा सोशल मीडियाला माहिती देऊ नये, असे निर्देश दिले आहेत. या आदेशामुळे जिल्हा परिषद प्रशासनात अक्षरशः माहितीबंदी लागू झाल्याची भावना व्यक्त होत आहे.संजय सावंत यांनी या निर्णयावर जोरदार आक्षेप घेताना म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१)(अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा प्रत्येक नागरिकाचा आणि प्रसारमाध्यमांचा घटनात्मक अधिकार आहे. प्रशासनाने जारी केलेले हे परिपत्रक त्या अधिकारांवर अप्रत्यक्ष निर्बंध आणणारे ठरत आहे. शासनाच्या योजना, विकासकामे, निधी खर्च, शैक्षणिक उपक्रम, आरोग्य सेवा आणि ग्रामीण विकासाशी संबंधित माहिती जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक असताना ती अध्यक्षांच्या मंजुरीच्या चौकटीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न लोकशाही व्यवस्थेला घातक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

जर कारभार पारदर्शक असेल तर माहिती देण्यासाठी परवानगीची अट का? असा सवाल उपस्थित करत सावंत यांनी प्रशासनातील गैरव्यवहार, भ्रष्टाचार, अनियमितता आणि अपयश झाकण्यासाठीच हा निर्णय घेतला गेला आहे का, अशी शंका उपस्थित केली आहे. लोकशाहीत प्रसारमाध्यमांची भूमिका केवळ प्रसिद्धीपत्रके छापण्यापुरती मर्यादित नसून सत्तेला प्रश्न विचारणे, जनहिताचे विषय समोर आणणे आणि प्रशासनाला जबाबदार धरणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.रायगड जिल्हा परिषद ही ग्रामीण भागातील लाखो नागरिकांशी थेट संबंधित संस्था आहे. अशा संस्थेतील अधिकारी आणि खातेप्रमुख यांना माध्यमांपासून दूर ठेवण्याचा निर्णय म्हणजे जनतेपासून माहिती लपविण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा सुरू झाली आहे. प्रशासनातील पारदर्शकतेऐवजी गोपनीयतेची भिंत उभारली जात असल्याचा आरोपही विविध स्तरांतून होत आहे.

महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे आणि लोकशाही मूल्यांचे राज्य म्हणून ओळखले जाते. मात्र एका जिल्हा परिषदेत सनदी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्रसारमाध्यमांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादणारा आदेश निघणे ही गंभीर बाब असून शासनाने याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

संजय सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केलेल्या निवेदनात रायगड जिल्हा परिषदेचे परिपत्रक (जा.क्र. राजिप/साप्रवि/परिषद/२८८/२०२६) तात्काळ रद्द करावे, प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करावे आणि जिल्हा परिषद प्रशासनातील पारदर्शकता कायम राखण्यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत, अशी ठाम मागणी केली आहे.

लोकशाहीत माहिती रोखणारे आदेश नव्हे, तर पारदर्शकता वाढविणारे निर्णय अपेक्षित असतात. प्रशासन हे जनतेचे सेवक आहे, माहितीचे मालक नाही, असा घणाघाती इशारा देत सावंत यांनी शासनाकडून त्वरित हस्तक्षेपाची अपेक्षा व्यक्त केली आहे.